अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शनिवार
३१.१०.२०२६

वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २७१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

वाघाच्या हल्ल्यांनी चंद्रपूर हादरले : एकाच दिवशी दोन शेतकऱ्यांचा बळी

एकाची रुग्णालयात मृत्यूशी झुंज, नागरिकांमध्ये प्रचंड भीती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



चंद्रपूर – जिल्ह्यात मानव आणि वन्यजीव संघर्ष पुन्हा एकदा गंभीर वळणावर पोहोचला असून वाघांच्या हल्ल्यांच्या घटनांनी संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. जंगलालगतच्या गावांमध्ये वाघांच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी एकाच दिवशी जिल्ह्यातील तीन वेगवेगळ्या ठिकाणी वाघांनी हल्ले केले. या घटनांमध्ये दोन शेतकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. गेल्या आठवडाभरात वाघांच्या हल्ल्यांत तीन जणांचा मृत्यू झाल्याने मानव-वन्यजीव संघर्षाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

चिमूर तालुक्यात ५५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू

पहिली घटना चिमूर तालुक्यातील गरडापार येथे घडली. येथील ५५ वर्षीय सदाशिव खडसंग यांच्यावर वाघाने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे गरडापार परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. जंगलालगतच्या भागात शेतीची कामे करताना नागरिकांना जीव मुठीत धरून काम करावे लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

सिंदेवाही तालुक्यातही वाघाचा हल्ला; वृद्ध शेतकऱ्याचा बळी

दुसरी घटना सिंदेवाही तालुक्यातील धुमनखेडा येथे घडली. शेतात काम करीत असताना ७० वर्षीय शेतकरी पत्रुजी मेश्राम यांच्यावर वाघाने हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या तालुक्यांत वाघांच्या हल्ल्यांत दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याने जिल्ह्यातील ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोंभुर्णा तालुक्यात एक जण गंभीर जखमी

तिसरी घटना पोंभुर्णा तालुक्यातील सातारा तुकूम परिसरात घडली. ६० वर्षीय राजेश्वर सिडाम हे गायी चारण्यासाठी जंगल परिसरात गेले असताना त्यांच्यावर वाघाने हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मानव-वन्यजीव संघर्षाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

“ जंगलालगतच्या गावांमध्ये वाघांचा वावर ही नागरिकांसाठी चिंतेची बाब बनली आहे. शेतकरी आणि शेतमजुरांना शेतीच्या कामांसाठी शेतात जावे लागते, तर पशुपालकांना जनावरे चारण्यासाठी जंगलालगतच्या परिसरात जावे लागते. अशा परिस्थितीत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांचा धोका कायम असल्याने ग्रामीण नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याला सुरुवात

राष्ट्रपतींच्या हस्ते रामकुंडावर ध्वजारोहण, गोदावरी घाटावर भाविकांची अलोट गर्दी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नाशिक – नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२६ च्या पर्वाला शनिवारी (दि.३१) धार्मिक ध्वजारोहणाने सुरुवात झाली. नाशिकमधील गोदावरी नदीच्या रामकुंडावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्यासाठी गोदावरी घाटावर संत-महंत, धार्मिक प्रतिनिधी आणि हजारो भाविक उपस्थित होते.

रामकुंडावर राष्ट्रपतींच्या हस्ते धार्मिक विधी

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रामकुंड येथे आयोजित ध्वजारोहण सोहळ्यात सहभाग घेत पारंपरिक धार्मिक विधी केले. या सोहळ्याची दृश्ये वृत्तसंस्था पीटीआयने प्रसिद्ध केली आहेत. तसेच, त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त तीर्थावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते धार्मिक ध्वजारोहण करण्यात आले. शृंगेरी शारदा पीठाचे जगद्गुरू श्री श्री भारती तीर्थ महास्वामीजी यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांनी पूजा केली. या सोहळ्यालाही संत, आध्यात्मिक गुरू, धार्मिक प्रतिनिधी, राजकीय नेते आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

दोन्ही तीर्थक्षेत्रांवर विशेष सजावट ध्वजारोहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर रामकुंड, गोदावरी घाट आणि कुशावर्त तीर्थ परिसरात विशेष सजावट करण्यात आली होती. धार्मिक सोहळे पाहण्यासाठी सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. अनेक आमदार, राजकीय नेते आणि धार्मिक प्रतिनिधींनीही या कार्यक्रमांना हजेरी लावली. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या दोन्ही तीर्थक्षेत्रांना भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत महत्त्वाचे स्थान आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे या ठिकाणी देशभरातून भाविक आणि साधू-संत दाखल होतात.

परराज्यात चारा पाठवण्यास बंदी : टंचाईवर मात करण्यासाठी कृती आराखडा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर परराज्यात चारा पाठवण्यास बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय पशुखाद्याच्या व्यतिरिक्त पॅकिंग, बायोफ्युएल, वीजनिर्मिती यासारख्या कामासाठी वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. चारा उत्पादनासाठी जिल्हा नियोजन निधीतील किमान ५ टक्के निधी दिला जाणार आहे. पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. सरकारने ३०४ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. या स्थितीवर उपाययोजना सूचविण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. या उपसमितीच्या निर्णयानुसार महसूल विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अभ्यासगटाने चारा टंचाईवर मात करण्यासाठी विविध शिफारशी केल्या आहेत.

गौवंश हत्या करुन मांस विक्री करणारे तिघे अटकेत : शेंदुरजनाघाटमध्ये स्थानिक गुन्हे शाखेची कारवाही

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – गोहत्या बंदी असतांना सुध्दा गौहत्या करुन मांस विक्री करीत असल्याच्या कारणावरुन स्थानिक गुन्हे शाखेने मलकापुर, शेंदुरजनाघाटमध्ये ३ विविध ठिकाणी धाड टाकून तिघांना ताब्यात घेतले असून त्यांचेजवळुन मोठया प्रमाणात गो मांस व कटाईसाठी आणलेली जनावरे सुध्दा जप्त केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाहीमुळे अवैधरित्या गौहत्या करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणचे पथक मोर्शी उपविभागातील पोलीस स्टेशन शे.घाट हददीत अवैध धंद्यांवर रेड कामी पेट्रोलिंग करीत असता कुरेशी मोहल्ला शे.घाट येथे इफतेखार शेख कालु कुरेशी हा जीवंत गोवंश जातीचे जनावरे तसेच गोवंश जनावराची कत्तल करून विक्री करीता गोवंश जनावराचे मास जवळ बाळगुन आहे. अशा प्राप्त खबरेवरुन स्थानिक गुन्हे शाखा पथकइफतेखार शेख कालु कुरेशी याचे घरी गेले असता व त्याचे घराची झडती घेतली असता २२० किलो गोमांस व वजन काटा लोखंडी पाते असे साहित्य किंमत अंदाजे ४९ हजार ३०० रुपयांचा मुद्येमाल व त्याचे घराशेजारी असलेल्या लोखंडी खांबाला जीवंत ४ गोवंश जनावरे कत्तली करीता आखुड दोराने बांधून ठेवलेले दिसुन आले किंमत अंदाजे ८४ हजार ३०० रुपये असा मुद्येमाल मिळुन आला.

मोहम्मद उमेर जमील अहमद कुरेशी याचे जुन्या घरात ६५ किलो गोमांस जवळ बाळगून असल्याचे दिसून आले तसेच इतर साहीत्य असे मिळून १७ हजार ७०० रुपयांचा मुद्येमाल मिळुन आला. आरोपी नामे जउर अहमद शेख हबीब कुरेशी याचे घराची झडती घेतली असता त्याचे घराचे ओसरीत गोवंश जनावराचे मास तसेच मास कापण्याचे साहीत्य जप्त करण्यात आले, गोमास ७५ किलो, लोखंडी धारदार शस्त्र, वजन गोटा व इतर साहीत्य असे एकूण किंमत अंदाजे १९ हजार रुपयांचा मुद्येमाल मिळुन आला. या कारवाईत ४ गोवंशीय जातीचे जनावरे व गोमांस असे मिळून किंमत अंदाजे १ लाख २१ हजार रुपयांचा मुद्येमाल मिळून आला. जीवंत मिळालेले ४ गोवंश पुढील पालनपोषण, चारापाणी व औषधोपचार साठी भवानीमाता गोसंरक्षण संस्थान पुसला येथे पाठविण्यात आले.

या प्रकरणी इफतेखार शेख कालु कुरेशी (४७), मोहम्मद उमेर जमील अहमद कुरेशी (२९), जउर अहमद शेख हबीब कुरेशी (५७) सर्व रा. कुरेशी मोहल्ला, मलकापूर यांचेविरुध्द कलम ३०३ (२), ३ (५) भान्यास सहकलम ५(क), ९ (अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस स्टेशन शें.घाट करीत आहेत.

सदरची कारवाई पोलिस अधिक्षक निकेतन कदम यांचे आदेशाने अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोउपनि आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार संदीप वानखे, रुपेश गावंडे, शांताराम सोनोने, विवेक घोरमाडे व चालक कुणाल भोयर यांनी केली.

तुकाराम मुंढेंच्या एफडीए कडून कारवाईचा धडाका सुरुच : छत्रपती संभाजीनगरमध्ये मसाला उत्पादक कंपनीवर पुन्हा मोठी कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नागपूर – ऐन दिवाळीच्या तोंडावर एकीकडे महागाईचा भडका उडाल्याचे चित्र आहे, तर दुसरीकडे मसाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळखोरीचे प्रकार समोर येत आहे. अशातच आगामी सण आणि उत्सवाच्या पार्श्वभूमीवर तुकाराम मुंढेंच्या अन्न व औषध प्रशासन विभाग अलर्ट मोडवर आलं असून नियमित खाद्यपदार्थांसह आता अन्न व औषध प्रशासनाचा मोर्चा मसाला व्यावसायिकांकडे वळला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये अन्न आणि औषध प्रशासनाने मसाला उत्पादक कंपनीवर पुन्हा मोठी कारवाई केलीये. गाढे जळगाव परिसरातील मेसर्स ५ स्टार मसाले कंपनीवर छापा टाकत या कारवाईत तब्बल २ हजार ८०२ किलो हळद, मिरची, धणे पावडर आणि मटण मसाल्याचा साठा जप्त करण्यात आलाय. मिळालेल्या माहितीनुसार, जप्त केलेल्या या मालाची किंमत १६ लाख ४० हजार ९०० रुपये आहे. विशेष म्हणजे, कारवाईनंतर कंपनीचा अन्न उत्पादन परवानाही तात्काळ निलंबित करण्यात आलाय.

दहावीनंतर करिअरची योग्य दिशा निवडण्यासाठी पेस आयआयटी ॲण्ड मेडीकल तर्फे आज मार्गदर्शन कार्यशाळा!

विद्यार्थी व पालकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – दहावीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी कोणती शाखा निवडावी, कोणत्या क्षेत्रात करिअरच्या अधिक संधी उपलब्ध आहेत, तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, अशा अनेक प्रश्नांमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण होतो. हा संभ्रम दूर करुन विद्यार्थ्यांना योग्य करिअरची दिशा मिळावी, या उद्देशाने पेस आयआयटी ॲण्ड मेडीकल यांच्या वतीने उद्या ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता 'दहावीनंतर पुढे काय?' या विषयावर विशेष करिअर कौन्सिलिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याच्या दृष्टीने दहावीनंतरचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. केवळ गुणांच्या आधारे शाखेची निवड न करता विद्यार्थ्यांची आवड, बौद्धिक क्षमता, कौशल्ये आणि भविष्यातील ध्येय लक्षात घेऊन योग्य अभ्यासक्रम निवडणे गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक क्षेत्रांची सविस्तर माहिती देण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत आयआयटीमध्ये शिक्षण घेतलेले अनुभवी व विषयतज्ज्ञ मार्गदर्शक प्रा.सतीश कुमार सिंग (गणित), प्रा.विकास पटेल (भौतिकशास्त्र) आणि प्रा.प्रिन्स गौतम (रसायनशास्त्र) हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. 'योग्य करिअर निवड ही उज्ज्वल भविष्याची पहिली पायरी' हा संदेश देत पेस आयआयटी ॲण्ड मेडीकल यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी हा मार्गदर्शनपर उपक्रम आयोजित केला आहे.

खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्याकडे मांडला

टेंभुरखेडा गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांच्या विविध समस्या जाणुन घेऊन त्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने तहसील कार्यालय येथे खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीत विविध गावांतील नागरिकांनी आपल्या समस्या मांडत संबंधित विभागांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या दरम्यान टेंभुरखेडा येथील नागरिकांनी त्यांच्या गावातील पाणीसमस्या मांडुन त्यावर उपाययोजना करण्याची मागणी केली.

यासंदर्भात ग्रामस्थांच्या वतीने खासदार डॉ.बोंडे यांना निवेदन सादर करण्यात आले. शेकदरी प्रकल्प किंवा भेमडी धरण येथुन टेंभुरखेडा गावासाठी कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन व पाणी शुद्धीकरण (फिल्टर) योजना मंजूर करुन देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली तसेच भेंमडी धरणालगत असलेल्या आमपेंड परिसरात ग्रामपंचायत टेंभुरखेडा अंतर्गत एक विहीर व दोन बोअरवेल असून त्या सद्य: बंदावस्थेत आहेत. सदर विहीर व बोअरवेल तातडीने दुरुस्त करुन सुरु करण्यात आल्यास गावातील पाणीटंचाईची समस्या काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, असेही सांगण्यात आले.

या आढावा बैठकीला तहसीलदार, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, ग्रामसेवक तसेच विविध बँकांचे अधिकारी उपस्थित होते. नागरिकांच्या प्रश्नांवर संबंधित विभागांच्या माध्यमातून कार्यवाही करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी ॲड.शशिकांत उमेकर, मनोज माहुलकर पाटील, डॉ.अमोल कोहळे, शशिभुषण उमेकर, सागर देशमुख, रविंद्र निंभोरकर, मुकेश देशमुख, अरुण जारी, भास्कर धोटे, मनोज देशमुख, हर्षु आजने, राजेंद्र पंधरे, मनिष कवटकर, महेश निंभोरकर, भाग्येश देशमुख, चंदू निंभोरकर, देवांग देशमुख, शुभम भोपती, अथर्व वागद्रे व लोकेश लुंगे यांच्यासह टेंभुरखेडा येथील नागरिक उपस्थित होते.

फटाकेबंदीच्या अंमलबजावणीबाबत पोलीस गंभीर नाही : उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचं निरीक्षण : १५ दिवसांच्या कारवाईचा तपशीलही मागवला

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – फटाकेबंदीच्या आदेशासंदर्भातील अंमलबजावणीबाबत पो-लीस गंभीर नसल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोंदवलं आहे. सार्वजनिक रस्ते आणि इतर वर्दळींच्या ठिकाणी फटाके फोडण्यावर बंदी असतानाही आदेशाचे उल्लंघन होत असल्याची नोंद न्यायालयाने नमूद केली आहे. तर फटाके विक्रीचे परवाने घेतलेल्या विक्रेत्यांची यादी सादर करण्याचे निर्देशही कोर्टाने प्रशासनाला दिले आहे. शिवाय, ५५ डेसिबलपेक्षा अधिक आवाजाच्या फटाक्यांच्या विक्रीवर बंदीची अट परवान्यात आहे का, अशी विचारणाही न्यायालयाने केली आहे. सोबतच गेल्या १५ दिवसांत पोलिसांनी केलेल्या कारवाईचा तपशील देखील उच्च न्यायालयाने मागवला आहे. दरम्यान, नागपूरच्या अंबाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बांधकामस्थळाच्या ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारीवर कारवाई न झाल्याने न्यायालयाने पोलिसांना फटकारले आहे. पोलीस आणि प्रशासनाला ३ नोव्हेंबरपर्यंत शपथपत्र दाखल करण्याचे आदेश कोर्टाने दिले आहे. तर सुनावणी न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झालीय.

नगर परिषद मराठी विद्यामंदिर येथे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – नगर परिषद मराठी विद्यामंदिर क्रमांक १ येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादनाचा कार्यक्रम श्रद्धापूर्वक आयोजित करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करुन त्यांच्या महान कार्याचे स्मरण केले.

यावेळी कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा गीताई मेश्राम व समिती सदस्य तानाजी नाकट यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमा दरम्यान मुख्याध्यापिका गीताई धुर्वे व शिक्षक दिनेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या विचारांतुन समाजाला एकता, बंधुता, स्वच्छता, श्रमप्रतिष्ठा आणि मानवसेवेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात जोपासावा आणि एक आदर्श नागरिक बनण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन यावेळी मार्गदर्शनातून करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षिका वर्षा टिकस, कांचन पखाले, निधी थोर, कर्मचारी गोपाळ सोनवणे, शोभा टिकस व सविता कवटकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

प्रा.अश्विनी फरकाडे यांना आचार्य पदवी प्रदान

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाकडून प्राणीशास्त्र विषयात पीएच.डी.

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – शेंदुरजनाघाट येथील प्रा.अश्विनी अनिल फरकाडे यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले असून, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने त्यांना विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील प्राणीशास्त्र (झूलॉजी) या विषयात आचार्य (पीएचडी) पदवी जाहीर केली आहे. त्यांच्या या यशामुळे शेंदुरजना-घाट परिसरातून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

प्रा.अश्विनी फरकाडे यांनी ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील संशोधन केंद्रातून प्राणीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ.किरण सांगवे यांच्या मार्गदर्शनाखाली आपले संशोधन पूर्ण केले.

प्रा.अश्विनी फरकाडे या सध्या एम.बी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देवरी, जिल्हा गोंदिया येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहेत.

त्यांनी मिळविलेल्या या शैक्षणिक यशाबद्दल त्यांचे कुटुंबिय, मित्रपरिवार, सहकारी प्राध्यापक आणि शेंदुरजनाघाट परिसरातील नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

सावंगीच्या पाणीप्रश्नासाठी खा.डॉ.बोंडे सरसावले : पंढरी प्रकल्पाचे पाणी सोडण्याबाबत अधिकाऱ्यांना सुचना

तालुक्यातील पाणीटंचाई, धवलगिरी नदीचे पाणी देवखेळा प्रकल्पात आणण्याचा प्रस्ताव आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफी व पीककर्जाच्या प्रश्नांवर चर्चा

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – तालुक्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या, जलस्रोतांचे योग्य नियोजन, शेतकऱ्यांच्या कर्जमाफी व पीककर्ज वाटपातील अडचणी तसेच सिंचन प्रकल्पांच्या प्रलंबित प्रश्नांना गती देण्यासाठी राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी नुकतीच तहसील कार्यालय येथे विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत तालुक्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करुन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

सावंगी गावाच्या पाणीप्रश्नासाठी पंढरी प्रकल्पातून पाणी सोडण्याच्या सूचना या बैठकीत सावंगी गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्याने उपस्थित करण्यात आला.

गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी होणारा त्रास लक्षात घेता बेल नदीच्या पात्रात पंढरी मध्यम प्रकल्पातून पाणी सोडण्याबाबत गावकऱ्यांशी चर्चा करुन योग्य नियोजन करावे आणि आवश्यक कार्यवाही करुन पाणी सोडण्यात यावे, अशा स्पष्ट सूचना खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पंढरी मध्यम प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा, पाण्याची आवश्यकता आणि बेल नदीच्या पात्रातून पाणी सोडण्याबाबत तांत्रिक बाबींचा विचार करुन ग्रामस्थांना विश्वासात घ्यावे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवून सावंगी गावातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

संपूर्ण तालुक्यातील पाणीपुरवठ्याचा आढावा सावंगी गावासह वरुड तालुक्यातील सर्व गावांच्या पाणीपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेऊन ज्या गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे किंवा आगामी काळात पाणीटंचाई उदभवण्याची शक्यता आहे, अशा गावांची माहिती घेऊन योग्य नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती, उपलब्ध जलस्रोत आणि नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होण्यासाठी आवश्यक उपाययोजना यांचा विचार करुन संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करावी. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य टंचाईचा पूर्वआढावा घेऊन नियोजन करावे, यावर खासदार डॉ.बोंडे यांनी भर दिला.

धवलगिरी नदीचे पाणी देवखेळा प्रकल्पात आणण्याच्या प्रस्तावाला गती द्या वरुड तालुक्यातील जलसंपदा आणि सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या धवलगिरी नदीच्या पाण्याचा योग्य उपयोग करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. धवलगिरी नदीतील उपलब्ध पाणी अल्प प्रमाणात बंदिस्त पाईपलाइनद्वारे पळसोणा सिंचन तलाव (देवखेळा प्रकल्प) येथे आणण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने मार्गी लावावा, अशा सूचना संबंधित जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी तपासून त्यांचे निवारण करावे तसेच शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज उपलब्ध होण्यासाठी बँका, सहकार विभाग आणि महसूल प्रशासन यांनी समन्वयाने काम करावे. शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळिवताना अनावश्यक त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही यावेळी सांगण्यात आले.

अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विविध प्रश्नांवर चर्चा या आढावा बैठकीला उपविभागीय अधिकारी सौरभ गावंडे, पंढरी मध्यम प्रकल्प तथा जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता अश्विनी राऊत, प्रमोद पालवे, कौशिक पांडे, अभिषेक पोहरे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता चव्हाण, नायब तहसीलदार गडलिंग, सहाय्यक निबंधक डॉ.आशिष चर्जन, गटविकास अधिकारी खुशाल पिल्लारे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

या बैठकीच्या माध्यमातून वरुड तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जलसंपत्तीचे नियोजन, सिंचन प्रकल्पांचे प्रस्ताव आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी यांना प्राधान्य देण्यात आले.

संबंधित विभागांनी केवळ आढावा न घेता प्रत्यक्ष कार्यवाही करुन नागरिक आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी भूमिका खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी मांडली. ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करणे, उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करणे आणि शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांना मार्गी लावणे यासाठी प्रशासनाने समन्वयाने व गतीने काम करावे, असा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आला.

संपादकीय

{ गर्दीचा भाग होण्यापेक्षा स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करा. }

महागाईच्या आगीत होरपळतोय सामान्य माणूस!

घरखर्च, शिक्षण, आरोग्य आणि उत्पन्नातील तफावत; जगण्याचा संघर्ष दिवसेंदिवस कठीण आज देशातील सामान्य माणसाचे जगणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. एकीकडे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडत आहेत, तर दुसरीकडे उत्पन्नाचे स्रोत आणि मिळणारे वेतन मात्र मर्यादित आहे. महागाईच्या वाढत्या झळांनी सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. महिन्याच्या सुरुवातीला मिळणारा पगार महिन्याच्या शेवटपर्यंत पुरवताना अनेक कुटुंबांची दमछाक होत आहे. त्यामुळे आज सामान्य माणसासमोर सर्वांत मोठा प्रश्न उभा आहे तो म्हणजे जगायचे कसे? घर चालविण्यासाठी लागणारे किराणा सामान, भाजीपाला, खाद्यतेल, गॅस, वीजबिल, पेट्रोल-डिझेल आणि घरभाडे अशा प्रत्येक बाबींचा खर्च वाढत आहे. पूर्वी ठरावीक रकमेत महिन्याचा किराणा सहज भागत होता; मात्र आता त्याच रकमेत आवश्यक वस्तू खरेदी करणेही कठीण झाले आहे. बाजारात गेल्यानंतर प्रत्येक वस्तूची किंमत पाहून सामान्य ग्राहकाला खरेदीचा निर्णय घ्यावा लागतो. गरजेच्या वस्तूंची यादी तयार होते, पण खिशातील पैशांचा हिशेब पाहून अनेक वस्तू बाजूला ठेवाव्या लागतात. ही परिस्थिती केवळ गरीब कुटुंबांची नसून मध्यमवर्गीय कुटुंबांनाही त्याचा मोठा फटका बसत आहे. महागाईचा सर्वाधिक परिणाम मध्यमवर्गीय आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या कुटुंबांवर होत आहे. ज्यांचे उत्पन्न निश्चित आहे, त्यांच्यासाठी वाढत्या खर्चाशी जुळवून घेणे मोठे आव्हान बनले आहे. कामगार, शेतमजूर, छोटे व्यावसायिक, नोकरदार आणि हातावर पोट असणाऱ्या कुटुंबांना प्रत्येक रुपयाचा विचार करून खर्च करावा लागत आहे. उत्पन्न वाढण्याचा वेग कमी आणि खर्च वाढण्याचा वेग अधिक असल्याने बचत करणे तर दूरच, अनेकांना महिन्याचा खर्च भागविण्यासाठी कर्जाचा आधार घ्यावा लागत आहे. शिक्षण क्षेत्रातही महागाईचा मोठा परिणाम दिसून येत आहे. शाळा-महाविद्यालयांचे शुल्क, वह्या-पुस्तके, गणवेश, शैक्षणिक साहित्य, प्रवास आणि खासगी शिकवणी यांचा खर्च वाढत चालला आहे. प्रत्येक पालकाला आपल्या मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे, मोठे व्हावे आणि आयुष्यात यशस्वी व्हावे असे वाटते. मात्र आर्थिक परिस्थितीमुळे अनेक पालकांना मुलांच्या शैक्षणिक गरजांवर मर्यादा आणाव्या लागत आहेत. शिक्षण हा प्रत्येक मुलाचा अधिकार असताना आर्थिक अडचणींमुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये, याची जबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे. आरोग्याचा प्रश्न तर अधिकच गंभीर बनला आहे. आजारपण कोणालाही सांगून येत नाही; मात्र खासगी रुग्णालयातील तपासण्या, औषधे, उपचार आणि रुग्णालयीन खर्च सामान्य कुटुंबाचे आर्थिक बजेट विस्कळीत करतात.

राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल!



भारताची विविधता हीच भारताची ताकद आहे. भाषा वेगवेगळ्या, संस्कृती वेगवेगळ्या, परंपरा वेगवेगळ्या; धर्म वेगवेगळे मात्र देश एक आहे. ही एकात्मता केवळ भावनिक पातळीवर टिकवून ठेवायची नसते, तर त्यासाठी दूरदृष्टी, संघटन कौशल्य, बंधुता, निर्णयक्षमता आणि प्रसंगी कठोर भूमिका घेण्याची तयारीही आवश्यक असते. भारताच्या इतिहासात या गुणांचा प्रभावी प्रत्यय देणारे नेतृत्व म्हणजे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल. म्हणूनच त्यांची जयंती ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो.

राष्ट्रीय एकता दिवसाची सुरुवात कधी झाली

भारत सरकारने २०१४ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. २२ ऑक्टोबर २०१४ रोजी केंद्र शासनाने या निर्णयाची घोषणा केली. त्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने २४ ऑक्टोबर २०१४ रोजी राष्ट्रीय एकता दिवसाच्या आयोजनासंदर्भात अधिकृत प्रसिद्धिपत्रक जारी केले. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी पहिला राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी एका आदेशाद्वारे त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करताना राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्याचे निर्देशित केले आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये वक्तृत्व, निबंध, नाटीका, व्याख्याने, आयोजित करण्याचे स्पष्ट केले आहे.

सरदार पटेल यांनी स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान आणि स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे विलीनीकरण करून भारताची एकात्मता दृढ करण्यासाठी केलेले ऐतिहासिक कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश होता. या दिवशी 'रन फॉर युनिटी', राष्ट्रीय एकतेची शपथ आणि संचलन यांसारख्या उपक्रमांद्वारे देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याचा संदेश दिला जातो. म्हणजेच हा दिवस केवळ एका महान नेत्याच्या स्मरणाचा नसून, राष्ट्राच्या एकात्मतेप्रती आपली जबाबदारी पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नातून घडलेले नेतृत्व

३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमधील नडियाद येथे जन्मलेल्या वल्लभभाई पटेल यांनी वकिलीच्या क्षेत्रात यश मिळवले होते. मात्र महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव आणि देशाच्या स्वातंत्र्याची ओढ यामुळे त्यांनी सार्वजनिक जीवनाचा मार्ग स्वीकारला. १९१८ मधील खेडा सत्याग्रह हा त्यांच्या नेतृत्वाचा महत्त्वाचा टप्पा ठरला. पिकांचे नुकसान आणि आर्थिक अडचणींमुळे महसूल भरणे कठीण झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी संघटित लढा उभारला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना एकत्र आणणे आणि संयमाने संघर्ष पुढे नेणे, ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये या आंदोलनातून स्पष्ट झाली. निडर, निर्भय व बाणेदार नेतृत्व म्हणून ते हळूहळू राष्ट्रव्यापी झाले.

१९२८ मधील बारडोली सत्याग्रहाने त्यांच्या नेतृत्वाला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली. महसुलातील वाढीव आकारणीविरोधात शेतकऱ्यांनी एकजूट दाखवली. पटेल यांनी या आंदोलनाचे प्रभावी संघटन केले. शिस्तबद्ध, ठाम आणि अहिंसक संघर्षाच्या बळावर शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळवून देण्याच्या या लढ्यामुळे त्यांना 'सरदार'ही उपाधी प्राप्त झाली. ही उपाधी त्यांना शेतकऱ्यांनी दिली. सरदार म्हणजे समूहाचा प्रमुख, नेता, नेतृत्व, मान्यता मिळालेला आदराचा माणूस त्यामुळे सरदार ही उपाधी केवळ सन्मानाची नव्हती; ती जनतेने त्यांच्या नेतृत्वावर दाखवलेल्या विश्वासाची पावती होती.

जनसेवेपासून स्वातंत्र्यलढ्या पर्यंत

अहमदाबाद नगरपालिकेतील त्यांच्या कार्यातून प्रशासनाकडे पाहण्याची व्यावहारिक दृष्टी दिसून आली. शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा आणि आरोग्यविषयक व्यवस्थांमध्ये सुधारणा करण्यावर त्यांनी भर दिला. सार्वजनिक पद म्हणजे अधिकार गाजवण्याचे साधन नसून, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी आहे, हा दृष्टिकोन त्यांच्या कामातून दिसतो. पुढे या अहमदाबाद नगर पालिकेचा अध्यक्ष देशाचा लोहपुरुष म्हणून नावलौकिकास आला.

१९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत आणि १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्यलढ्यातील सहभागामुळे त्यांना कारावास भोगावा लागला. संघटनकौशल्य, निर्णयक्षमता आणि जनतेला एकत्र आणण्याची क्षमता या गुणांच्या बळावर ते राष्ट्रीय चळवळीतील प्रमुख नेत्यांपैकी एक बनले.

स्वातंत्र्यानंतरची ऐतिहासिक जबाबदारी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; पण स्वातंत्र्य मिळाले म्हणजे देशाची राजकीय एकात्मता पूर्ण झाली, असे नव्हते. त्या वेळी ब्रिटिश भारताबरोबरच ५६० हून अधिक संस्थाने अस्तित्वात होती. ब्रिटिश सत्तेचा अंत झाल्यानंतर या संस्थानांच्या भवितव्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला. अनेक संस्थानांचे स्वतंत्र राहण्याचे किंवा भारत-पाकिस्तान यांपैकी एखाद्या देशात सामील होण्याचे पर्याय विचाराधीन होते. अशा परिस्थितीत भारताचे राजकीय विभाजन टाळणे, हे नव्या नेतृत्वापुढील मोठे आव्हान होते.

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री म्हणून सरदार पटेल यांनी संस्थानांच्या विलीनीकरणाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. व्ही. पी. मेनन यांच्यासारख्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने त्यांनी संस्थानिकांशी चर्चा, समजूत, मुत्सद्देगिरी आणि परिस्थितीनुसार ठाम प्रशासकीय निर्णय यांचा वापर केला. त्यांच्या नेतृत्वामुळे विविध संस्थाने भारतीय संघराज्यात सामील होण्याची प्रक्रिया पुढे गेली. हे काम केवळ राजकीय करारांचे नव्हते; भारताच्या भविष्यातील भौगोलिक अखंडतेचा आणि प्रशासनाच्या स्थैर्याचा तो पाया होता.

जुनागढ आणि हैदराबाद : निर्णयक्षमतेची कसोटी

जुनागढच्या संस्थानाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा भारताच्या भौगोलिक आणि राजकीय हितांचा विचार करून पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. पुढे हैदराबाद संस्थानाच्या भारतातील विलीनीकरणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा ठरला. वाटाघाटी आणि प्रयत्नांनंतरही प्रश्न सुटत नसल्याने सप्टेंबर १९४८ मध्ये 'ऑपरेशन पोलो' ही पोलीस कारवाई करण्यात आली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादच्या विलीनीकरणाचा मार्ग मोकळा झाला. या घटनांमधून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नावर त्यांनी मुत्सद्देगिरीसोबतच आवश्यक तेव्हा कठोर निर्णय घेण्याची तयारीही दाखवली.

संस्थानांच्या विलीनीकरणाबरोबरच स्वतंत्र भारताची प्रशासकीय चौकट सक्षम करण्यावरही पटेल यांनी भर दिला. अखिल भारतीय सेवांच्या बळकटीकरणासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. देशाच्या विविध भागांत प्रशासनाची सातत्यपूर्ण आणि समन्वयित यंत्रणा कार्यरत राहणे, हे राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती.

एकसंघ भारताची पायाभरणी

स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर भारतासमोर केवळ परकीय सत्तेतून मुक्त होण्याचे आव्हान नव्हते; तर अनेक संस्थाने, विविध राजकीय हितसंबंध आणि अनिश्चित भविष्य यांना एकाच राष्ट्रीय चौकटीत आणण्याचेही आव्हान होते. अशा निर्णायक काळात सरदार वल्लभभाई पटेल यांनी दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, धैर्य आणि ठाम निर्णयक्षमतेच्या बळावर संस्थानांच्या विलीनीकरणाला गती दिली. त्यामुळे आधुनिक भारताच्या राजकीय एकात्मतेचा पाया अधिक भक्कम झाला. आज आपण एकसंध भारताचे नागरिक म्हणून अभिमानाने उभे आहोत, त्या ऐतिहासिक प्रक्रियेत सरदार पटेल यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. म्हणूनच त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करणे, हा इतिहासाचा गौरव करण्याबरोबरच भारताची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याच्या संकल्पाचे नूतनीकरण करण्याचा दिवस आहे.

प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर
९७०२८५८७७७

विकसित भारताच्या स्वप्नासाठी सर्वसमावेशक विकासाला प्राधान्य!

सामाजिक सक्षमीकरणासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांमध्ये शिक्षण हा विषय केंद्रस्थानी आहे. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित समुदायांतील विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य दिल्यास त्यांना त्यांचे शालेय शिक्षण सुरू ठेवण्यास, उच्च शिक्षणाची दारे खुली होण्यास तसेच संशोधन आणि व्यावसायिक क्षेत्रातील त्यांच्या महत्त्वाकांक्षेला पाठबळ मिळण्यास मदत होऊ शकते.

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभागाने २०१४-१५ ते २०२५-२६ या आर्थिक वर्षांदरम्यानच्या काळात शिष्यवृत्ती, प्रशिक्षण सहाय्य, परदेशात शिक्षण घेण्यासाठी पुरवलेली मदत आणि संशोधन फेलोशिपच्या माध्यमातून ही उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. विभागाच्या दृष्टिकोनात आर्थिक अडचणी कमी करण्यावर तसेच शैक्षणिक सातत्याला बळकट करण्यावर मुख्य भर आहे. या विभागाद्वारे करण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या माध्यमातून अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग, आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग तसेच विमुक्त, भटक्या आणि अर्ध-भटक्या जमातींसाठी संधींची उपलब्धता वाढवण्याचा प्रयत्न असतो. आर्थिक मदतीसोबतच, शिष्यवृत्ती देण्याच्या कामकाज प्रक्रियेत केलेल्या सुधारणांद्वारे पारदर्शकता, लाभार्थ्यांची पडताळणी आणि मदतीचे थेट हस्तांतरण या गोष्टींवर प्रकर्षाने भर दिला गेला आहे.

शालेय स्तरापासूनच शिक्षणाला पाठबळ अनुसूचित जाती आणि इतर घटकांसाठीच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत (प्री-मॅट्रिक स्कॉलरशिप्स स्कीम) शैक्षणिक काळाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच शिक्षणासाठी सहाय्य केले जाते. साक्षरतेचा प्रसार करणे, शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे आणि अनुसूचित जातींच्या मुलांच्या, तसेच ज्यांचे पालक किंवा पालकत्व स्वीकारलेली व्यक्ती अस्वच्छ किंवा जोखमीच्या व्यवसायांत गुंतलेली आहे अशा मुलांच्या शालेय शिक्षणात सातत्य राखणे हा या केंद्र पुरस्कृत योजनेमागील उद्देश आहे.

या योजनेंतर्गत २०१४-१५ ते २०२५-२६ या आर्थिक वर्षांच्या कालावधीत, ४,८९३ कोटी रुपयांचे केंद्रीय सहाय्य वितरित करण्यात आले असून, या काळात नोंदविली गेलेली लाभार्थींची संख्या सुमारे तीन कोटी आहे. २०२५-२६ या अवघ्या एकाच आर्थिक वर्षात ५६२ कोटी रुपये जारी केले गेले असून त्याचा जवळपास २७ लाख विद्यार्थ्यांना लाभ मिळाला आहे. वंचित मुलांना शालेय शिक्षण घेण्यात येणाऱ्या आर्थिक अडचणी दूर करून, त्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यास मदत करणे हा या योजनेचा प्रयत्न आहे.

शालेय टप्प्यानंतरच्या शिक्षणासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना अंतर्गत सहाय्य पुरवले जाते. माध्यमिक शिक्षणानंतरच्या पुढील शैक्षणिक संधींच्या उपलब्धतेत वाढ व्हावी, विद्यार्थ्यांना शिक्षण सुरू ठेवण्यास भक्कम आधार देणे आणि उच्च शिक्षणात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे हा या फ्लॅगशिप उपक्रमाचा उद्देश आहे.

या योजनेंतर्गत आर्थिक वर्ष २०१४-१५ ते २०२५-२६ या कालावधीत ४६,५८१ कोटी रुपयांचे केंद्रीय सहाय्य प्राप्त झाले असून, या काळात जवळपास ६.१३ कोटी लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये या योजनेद्वारे ४७.५३ लाख विद्यार्थ्यांना सहाय्य देण्यात आले.

डिजिटल सुधारणांद्वारे पारदर्शकतेला बळकटी आर्थिक वर्ष २०२१-२२ पासून शिष्यवृत्ती वितरणासंबंधीच्या नियमावलीत करण्यात आलेल्या 'थेट लाभ हस्तांतरण' (डीबीटी) प्रणालीचा अंतर्भाव हा उल्लेखनीय बदल ठरला आहे. या प्रणालीच्या माध्यमातून, शिष्यवृत्तीची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या आधार-संलग्न बँक खात्यांमध्ये जमा केली जाते. उत्तरदायित्व अधिक बळकट करणे, मदतीची रक्कम मिळण्यात होणारा विलंब आणि गळती (निधीचा अपव्यय) कमी करणे आणि विद्यार्थ्यांपर्यंत मदत पोहोचवण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी करणे या हेतूने ही सुधारणा करण्यात आली आहे.

डिजिटल पडताळणी या चौकटीचा आणखी एक महत्त्वाचा भाग बनला आहे. दुबार लाभार्थींची नावे काढून टाकण्याच्या यंत्रणांमुळे बनावट किंवा दुबार लाभार्थी ओळखण्यास मदत होत आहे, तर बायोमेट्रिक प्रमाणीकरण आणि इलेक्ट्रॉनिक 'नो युवर कस्टमर' पडताळणीमुळे ओळख पडताळणी करण्यास आणखी मदत होत आहे. डिजीलॉकर आणि एपीआय सेतूची त्याला जोड मिळाल्यामुळे प्रमाणपत्रे आणि कागदपत्रांच्या डिजिटल पडताळणीच्या कामात ते सहाय्यक बनले आहे. एकदाच नोंदणीमुळे विविध योजना आणि शैक्षणिक वर्षांमधील लाभार्थ्यांचा माग ठेवणे शक्य झाले आहे. या सर्व उपाययोजनांचा एकत्रित परिणाम प्रशासकीय प्रणालींना बळकटी मिळण्याच्या रूपाने होऊन त्यांच्यामुळे शिष्यवृत्ती सहाय्य पात्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे

‘सुरक्षित बचपन अभियान’ विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – बालकांचे संरक्षण, त्यांचे हक्क आणि सुरक्षिततेविषयी जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने तालुका विधी सेवा समिती आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे ‘सुरक्षित बचपन अभियान’ अंतर्गत कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी ‘लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण’ या संवेदनशील विषयावर विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडून मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका वकील संघाचे अध्यक्ष ए.आर.घाटोळे तर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणुन अतिरिक्त सरकारी अभियोक्ता जिल्हा न्यायालय सुशील दामोदर, तालुका वकील संघाचे सदस्य अॅड.डी.पी.सदापुरे, अॅड.ए.आर.जयस्वाल, अॅड.जी.एम.मोरे, ॲड.व्ही.जे.मिरगे आणि ॲड.पी.बी.कोल्हारे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर बालसुरक्षेचे महत्त्व अधोरेखित करणारी तीन ते चार मिनिटांची प्रभावी ऑडिओ-व्हिडिओ क्लिप विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. या माध्यमातून बालकांच्या सुरक्षिततेविषयी प्राथमिक जाणीव निर्माण करण्यात आली. यानंतर ॲड.डी.पी.सदापुरे आणि ॲड.ए.आर.जयस्वाल यांनी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात ए.आर.घाटोळे यांनी बालकांचे कायदेशीर हक्क आणि त्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांचे महत्त्व स्पष्ट केले. दरम्यान, या उपक्रमाचे संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सचिव अनिल गुल्हाने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, सहसचिव शाम खंडेलवाल आणि सदस्य विनय यावलकर यांनी कौतुक केले.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी भोंडे, शाळा समन्वयक श्वेता गणोरकर, जनसंपर्क अधिकारी किशोर देशमुख आणि प्राथमिक विभाग प्रमुख पराग भोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन विनोद भाकरे यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जुन्या भांडणाच्या कारणावरुन

दोन भावांच्या कुटूंबियांमध्ये वाद : १ जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – जुन्या भांडणाच्या कारणावरुन गणेशपुर येथे दोन भावांमध्ये झालेल्या हाणामारीत एक भाऊ गंभिर जखमी झाल्याची घटना घडली. या प्रकरणी वरुड पोलिसांनी बाप-लेकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी क्र.१ दुर्योधन हा फिर्यादीचा भाऊ व आरोपी क्र.२ प्रतिक हा पुतण्या असुन त्यांच्यात जुना वाद सुरु आहे. २८ ऑक्टोंबरच्या सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास फिर्यादी जनार्दन मेश्राम हे मोवाड येथे बाजार करणेकरीता जात असतांना जुन्या भांडणाच्या कारणावरुन नमुद दोन्ही आरोपींनी फिर्यादी सोबत वाद केला व शिवीगाळ केली. आरोपी क्र.१ दुर्योधन याने त्याचे हातातील काठीने फिर्यादी जनार्दन यांच्या डोक्यावर मागचे बाजुस मारले.

त्यामुळे ते जखमी झाले तसेच आरोपी क्र.२ प्रतिक मेश्राम याने फिर्यादीच्या शरीरावर काठीने मारहाण केली तसेच शिवीगाळ करुन पुन्हा मारण्याची धमकी दिली अशा जनार्दन महादेव मेश्राम (६०) रा.गणेशपुर यांच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी यांचे दुर्योधन महादेव मेश्राम (५५), प्रतिक दुर्योधन मेश्राम (२५) दोन्ही रा.गणेशपुर याचे विरुध्द कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२), ३ (५), भा.न्या.सं.२०२३ अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

दिव्यांगांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे यासाठी ठाण्यात राज्यस्तरीय अधिवेशन

१ नोव्हेंबर रोजी ठाणे येथे आयोजन : स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामनिर्देशित प्रतिनिधित्वाच्या मागणीवर होणार सविस्तर चर्चा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मोर्शी – महाराष्ट्रातील दिव्यांग व्यक्तींना केवळ शासकीय योजनांचे लाभार्थी न ठेवता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र दिव्यांग राजकीय प्रतिनिधित्व अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना राजकीय क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

याच अभियानाचा एक भाग म्हणून राज्यस्तरीय समन्वय समितीच्या वतीने रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी ठाणे येथील दिव्यांग मैत्री कार्यालय, अष्टविनायक चौक, चेंदणी कोळीवाडा, कोपरी येथे राज्यस्तरीय दिव्यांग अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्तीसगड, राजस्थान आणि तामिळनाडू या राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद आणि महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिव्यांग व्यक्तींना नामनिर्देशित राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, या विषयावर अधिवेशनात सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. तसेच या मागणीच्या पूर्ततेसाठी अभियानाची पुढील दिशा आणि कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे.

या अधिवेशनाला राज्यभरातील दिव्यांग बांधव-भगिनी तसेच विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र दिव्यांग राजकीय प्रतिनिधित्व अभियान राज्यस्तरीय समन्वय समितीचे अध्यक्ष प्रशांत जाधव, कार्यकारी समन्वयक चंपतराव डाखोरे, सचिव सुहास काळे, राजेंद्र देशमुख तसेच समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

ऊस दरावर दुसऱ्या बैठकीत सुद्धा तोडगा नाहीच

ऊसाचं कांड सुद्धा कारखान्याला देणार नाही, राजू शेट्टींचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

कोल्हापूर – ऊस दरासाठी बोलावण्यात आलेली आजची (३० ऑक्टोबर) बैठक निष्फळ ठरली. त्यामुळे दुसऱ्या बैठकीत सुद्धा ऊस दरावर तोडगा निघाला नाही. ऊस दरासाठी शेतकऱ्यांसह स्वाभिमानी शेतकरी संघटना ठाम आहे.

यावेळी बैठकीत कारखानदार अभ्यास करून न आल्याचा राजू शेट्टी यांनी आरोप केला. जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत ऊसाचे कांडे सुद्धा कारखान्याला देणार नाही, असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. शेतकरी कारखानदारांना सोयीचे होईल, अशीच यावेळी भूमिका घेत आहेत, त्यामुळे कारखानदारांनी सुद्धा योग्य दर देण्याची भूमिका घ्यावी, अशी मागणी शेट्टी यांनी केली.

लवकरच तोडगा काढण्यात येईल दरम्यान, ऊस दरासाठी योग्य तो समन्वय साधण्यासाठी शेतकरी संघटनांचे पदाधिकारी आणि साखर कारखानदार यांच्यासोबत संयुक्त बैठक घेऊन प्रती टन ऊसाला योग्य दर देण्याबाबत लवकरच तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

बिटकर म्हणाले, ऊस उत्पादकांना गळीत हंगामात येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातील. उसाच्या दराबाबत प्रत्यक्ष निर्णय घेण्यासाठी साखर कारखानदार आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत चर्चा केली जाईल यानंतर लवकरच ऊस दराबाबत सकारात्मक मार्ग काढला जाईल.

राजू शेट्टी म्हणाले की ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अपेक्षित असणारा दर आणि साखर कारखानदारांकडून देण्यात येणाऱ्या दरामध्ये तफावत आहे.

तू..तू..मैं..मैं.. सुरुच : भाजप-शिंदेसेनेतील वाद चिघळला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – विधान परिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील दारुण पराभवानंतर भाजप आणि शिवसेना शिंदे गटात सुरू असलेले आरोप-प्रत्यारोपांचे सत्र शुक्रवारी दुसऱ्या दिवशीही सुरूच होते.

भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन, शिवसेना शिंदे गटाचे आमदार निलेश राणे आणि माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्यातील वाक्य? युद्धामुळे भाजप आणि शिंदे गट यांच्यातील वाद चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निलेश राणे यांनी शुक्रवारी सिंधुदुर्गमध्ये पत्रकार परिषद घेऊन नवनाथ बन यांना लक्ष्य केले. ‘तुझा जीव एवढा आणि तू बोलतो केवढा’, अशा शब्दांत राणे यांनी बन यांचा एकेरी उल्लेख केला. शिंदेंवर बोलण्याचा अधिकार नवनाथ बन यांना नाही. आम्ही कधीही भाजपच्या नेत्याला कुठल्याही निवडणुकीतील पराभवाला जबाबदार ठरवलेले नाही. शिंदेंची मूकसंमती आहे का, हे तू कोण विचारणारा?

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबत. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२९४/२०२६ ने.ता.१८/१२/२०२६

अर्जदार :- शेरखान इद्रीस खान
वय अं.५० वर्ष, धंदा-मजुरी
रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी न.प.कार्यालय, शेंदुरजनाघाट
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे शेरखान इद्रीस खान यांचा जन्म दि.०५/१०/१९७६ रोजी शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे शेरखान इद्रीस खान यांचा जन्म दि.०५/१०/१९७६ रोजी शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.१८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबत. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२२९/२०२६ ने.ता.०३/१२/२०२६

अर्जदार :- मोहम्मद असरार मोहम्मद साबीर
वय अं.३४ वर्ष, धंदा-मजुरी
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी न.प.कार्यालय, वरुड
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे मोहम्मद असरार मोहम्मद साबीर यांचा जन्म दि.२५/०५/१९९२ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **मोहम्मद असरार मोहम्मद साबीर यांचा जन्म दि.२५/०५/१९९२ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०३/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२१/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबत. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२९२/२०२६ ने.ता.१७/१२/२०२६

अर्जदार :- रुखमा नामदेवराव रेवतकर, (लग्नापुर्वीचे नाव)
रुखमा नामदेवराव रेवतकर, (लग्नापुर्वीचे नाव)
वय अं.६७ वर्ष, धंदा-घरकाम
रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- ग्रामसेवक/सचिव ग्राम.पं.कार्यालय, आमनेर

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे रुखमा नामदेवराव रेवतकर हीचा जन्म दि.०१/०७/१९५९ रोजी आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे रुखमा नामदेवराव रेवतकर हीचा जन्म दि.०१/०७/१९५९ रोजी आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.१७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

‘समृद्धी’ महामार्ग रोखण्याचा प्रयत्न; वाशिममध्ये शेतकऱ्यांचे आंदोलन, पोलिसांनी ठाकरे सेनेच्या नेत्यांना रोखले

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

वाशिम – दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अपुरी मदत मिळत असल्याच्या निषेधार्थ समृद्धी महामार्गावर आंदोलन करण्यासाठी निघालेले उबाठाचे आमदार नितीन देशमुख आणि त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांना शुक्रवारी पोलिसांनी ताब्यात घेतले. आमदार देशमुख आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. तसेच पीकविमा दाव्यांचा तातडीने निपटारा करावा आणि शेतमालाला योग्य भाव मिळावा, अशीही त्यांची मागणी आहे. शेकडो उबाठा कार्यकर्ते आणि शेतकरी हे वानोजा येथे समृद्धी महामार्गावर ‘रास्ता रोको’ करण्यासाठी निघाले होते. मात्र, महामार्गावर पोहोचण्यापूर्वीच पोलिसांनी आमदार देशमुख आणि त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना ताब्यात घेतले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. महामार्गावर आंदोलन करण्यास पोलिसांनी परवानगी नाकारली होती. मात्र,तरीही आंदोलन करण्याच्या निर्णयावर आंदोलक ठाम होते, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.प्रशासनाने दीड हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात केला होता.

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२९३/२०२६ **ने.ता.१८/१२/२०२६**

अर्जदार :- भुरे खाँ युसुफ खाँ
वय अं.६१ वर्ष, धंदा-मजुरी
रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- ग्रामसेवक/सचिव ग्राम.पं.कार्यालय, आमनेर
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे भुरे खाँ युसुफ खाँ यांचा जन्म दि.०१/०४/१९६५ रोजी आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे भुरे खाँ युसुफ खाँ यांचा जन्म दि.०१/०४/१९६५ रोजी आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.१८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.१९२/२०२६ **ने.ता.०३/१२/२०२६**

अर्जदार :- शेख अजीज शेख बशीर
वय अं.६४ वर्ष, धंदा-मजुरी
रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- ग्रामसेवक/सचिव ग्राम.पं.कार्यालय, आमनेर
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांची मुलगी **नामे फरजाना उर्फ शिरीन नाज अजीज शेख हीचा जन्म दि.०१/०३/१९८७ रोजी आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांची मुलगी **नामे फरजाना उर्फ शिरीन नाज अजीज शेख हीचा जन्म दि.०१/०३/१९८७ रोजी आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि. / /२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२१/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२२४/२०२६ **ने.ता.०८/१२/२०२६**

अर्जदार :- नारायण भीमराव खोरगडे
वय अं.५८ वर्ष, धंदा-शेती
रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- ग्रामसेवक/सचिव ग्राम.पं.कार्यालय, सुरळी
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे नारायण भीमराव खोरगडे यांचा जन्म दि.१०/०७/१९६८ रोजी सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नारायण भीमराव खोरगडे यांचा जन्म दि.१०/०७/१९६८ रोजी सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२२५/२०२६ **ने.ता.२७/११/२०२६**

अर्जदार :- रिजवाना अंजुम शेख जाबीर
वय अं.२९ वर्ष, धंदा-घरकाम
रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- ग्रामसेवक/सचिव ग्राम.पं.कार्यालय, आमनेर
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे रिजवाना अंजुम शेख जाबीर हीचा जन्म दि.१२/११/१९९६ रोजी आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅण्ड डेथ अॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **रिजवाना अंजुम शेख जाबीर हीचा जन्म दि.१२/११/१९९६ रोजी आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

६ राज्यांत ड्खठ च्या मुदतीत वाढ : निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

नवी दिल्ली – भारतीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह पाच राज्ये आणि दिल्ली या केंद्रशासित प्रदेशातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल परीक्षणाचा (एसआयआर) सुधारित कार्यक्रम जाहीर केला. संबंधित राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्रात १३ नोव्हेंबरपर्यंत हरकती नोंदवता येणार महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, हरयाणा, तेलंगणा आणि नागालँड या पाच राज्यांमधील ‘एसआयआर’चे वेळापत्रक बदलण्यात आले आहे. तसेच दिल्लीतील कार्यक्रमालाही मुदतवाढ देण्यात आली आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाने संबंधित राज्ये आणि दिल्लीला स्वतंत्र पत्र पाठवले आहे. महाराष्ट्रात मतदार यादीसंदर्भातील दावे आणि हरकती दाखल करण्याची अंतिम मुदत २६ ऑक्टोबरवरून वाढवून १३ नोव्हेंबर करण्यात आली आहे. नोटीस बजावण्याची आणि दावे–हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया आता २५ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. त्यानंतर अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. महाराष्ट्रातील प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. यापूर्वी दावे आणि हरकती निकाली काढण्याची अंतिम मुदत १० नोव्हेंबर निश्चित करण्यात आली होती. दिल्लीत दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत ३० ऑक्टोबरऐवजी आता २५ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे.

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९६६/२०२६ **ने.ता.१७/१२/२०२६**

अर्जदार :-
१) सतीश बाळकृष्ण बुटे, वय अं.४२ वर्ष, धंदा-शेती
रा.गाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती
२) सौ.छाया राजेंद्र मांगलकर,, वय अं.६० वर्ष, धंदा-गृहिणी
रा.वाठोडा (चांदस), ता.वरुड, जि.अमरावती
३) सौ.पुजा खुशालराव बानाबाकोडे, वय अं.५० वर्ष, धंदा-गृहिणी
रा.पिंपळगांव (राऊत), ता.नरखेड, जि.नागपूर

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत बाळकृष्ण श्रावणजी बुटे व मयत सुमनबाई बाळाकृष्ण बुटे, रा.गाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९९०/२०२६ **ने.ता.१६/१२/२०२६**

अर्जदार :-
१) श्रीमती आशा पुरुषोत्तम सावंगीकर, वय अं.५६ वर्ष, धंदा-गृहिणी, २) स्तवन पुरुषोत्तम सावंगीकर, वय अं.३३ वर्ष, धंदा-शेती, ३) शमुवेल पुरुषोत्तम सावंगीकर, वय अं.२६ वर्ष, धंदा-काही नाही, क्र.१ ते ३ रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत पुरुषोत्तम झिंगराजी सावंगीकर, रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९६७/२०२६ **ने.ता.१७/१२/२०२६**

अर्जदार :-
१) महेंद्रसिंग उत्तमसिंग तायडे, वय अं.५७ वर्ष, धंदा-शेती, रा.गाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती, २) श्रीमती नलिनी कृष्णराव सोळंके, वय अं.७० वर्ष, धंदा-गृहिणी, रा.कवळा (खानापूर), ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती, ३) सौ.मंदा जयसिंग झाडे, वय अं.६५ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.वडगांव, ता.दारव्हा, जि.यवतमाळ, ४) श्री.अभिजीत राजुभाऊ देशमुख, वय अं.३६ वर्ष, धंदा-काही नाही, ५) संदेश राजुभाऊ देशमुख, वय अं.३० वर्ष, धंदा-शिक्षण, क्र.४ व ५ रा.येरमलहेटी, ता.आर्णी, जि.यवतमाळ

... विरुध्द ... **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत उत्तमसिंग माणिकसिंग तायडे व मयत शेवंता उत्तमसिंग तायडे, रा.गाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९६५/२०२६ **ने.ता.१६/१२/२०२६**

अर्जदार :-
१) पुंडलिक गंगाधर सोनारे, वय अं.५५ वर्ष, धंदा-शेती
२) प्रभाकर गंगाधर सोनारे, वय अं.५३ वर्ष, धंदा-शेती
क्र.१ व २ रा.गाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती
३) श्रीमती सुनिता संजय घाटोळे, वय अं.५१ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.बोरगांव, ता.आष्टी, जि.वर्धा,
४) सौ.सिंधु तुकाराम कळमटे, वय अं.४९ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.सिंभोरा, ता.मोर्शी, जि.अमरावती

... विरुध्द ... **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत गंगाधर मोतिराम सोनारे व मयत गिताबाई गंगाधर सोनारे, रा.गाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	१६५० -	२०००
गहू -	२५०० -	३०००
तूर -	६१०० -	६३९०
मूग -	६५०० -	७०००
उडीद -	६००० -	७०००
हरभरा -	५६०० -	५९००
सोयाबिन -	४१०० -	४३५०
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	८२०० -	९३००
भुईमूग -	५१५० -	५३५०
मका -	२२०० -	२३००

अल्पवयीन युवतीचा विनयभंग करुन जीवे मारण्याची धमकी

दोघांविरुद्ध गुन्हा दाखल : टेंभुरखेडा शेतशिवारातील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – फिर्यादी शेषराव धुर्वे यांची नात्याने भाची असलेल्या महिलेसोबत गैरवर्तन करुन तिचा विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. टेंभुरखेडा येथील प्रकाश राऊत यांच्या शेतात ही घटना घडली असून या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी देवांष ओमकार देवळे (१९) याने फिर्यादी शेषराव यांच्या भाचीचा हात पकडून

तिच्याशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला तसेच आरोपी वेदांत मांडळे (२०) याने पिडितेला चापट मारुन तिच्याशी अशोभनीय वर्तन केले. यावेळी आरोपींनी फिर्यादी शेषराव धुर्वे व त्यांच्या कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे पीडित महिलेला अपमानास्पद वागणुक सहन करावी लागल्याने फिर्यादीचे मामा शेषराव सकरसिंग धुर्वे (३५) रा.प्रकाश राऊत यांचे टेंभुरखेडा शेतशिवारातील शेत यांच्या फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी कलम ७४, ११५ (२), ३५१ (३) ३ (५), भा.न्या.सं.२०२३ सहकलम ८, १२ बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

विनापरवाना रेतीची वाहतुक : २० लाखांचा मुद्देमाल जप्त

पांढुर्णा रस्त्यावरील टोल प्लाजाजवळील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – विना परवाना रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करत पोलिसांनी २० लाख रुपये किंमतीचे वाहन आणि ३० हजार रुपये किंमतीची रेती असा एकूण २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी चालक गणेश रमेश कोकोडे हा एमएच २७ डीटी ९६९७ क्रमांकाच्या वाहनातून कोणताही परवाना नसतांना सहा ब्रास रेतीची वाहतूक

करताना आढळून आला. यावेळी पोलिसांनी पंचांसमक्ष सदर वाहन व रेती जप्त केली.

जप्त करण्यात आलेल्या वाहनाची किंमत अंदाजे २० लाख रुपये, तर सहा ब्रास रेतीची किंमत ३० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी पोहेकॉ.विष्णु पवार यांचे फिर्यादीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी एमएच २७ डीटी ९६९७ क्रमांकाचा चालक गणेश रमेश कोकोडे (३४) व तेजस धनराज नथिले दोन्ही पुसला यांचेविरुद्ध कलम ३०३, २४९ बीएनएस सहकलम ९, १५ पर्यावरण अधिनियम ४८, ७८ महसुल अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

लाडकी बु. येथे ३२ वर्षीय शेतकरी पुत्राची आत्महत्या : गावात शोककळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मोर्शी – तालुक्यातील लाडकी बु. येथे सूरज अरविंद वडे (वय ३२) या तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना काल दुपारी ४ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सूरज वडे हा लाडकी बु. येथील रहिवासी होता. त्याच्या वडिलांच्या नावे सहा एकर ओलीत शेती असून, कुटुंबात आई-वडील

आणि भाऊ असा परिवार आहे.

घटनेनंतर मृतदेह मोर्शी येथे शवविच्छेदनासाठी आणण्यात आला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. आज लाडकी बु. येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तरुणाच्या निधनामुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. या प्रकरणी पुढील तपास शिरखेड पोलीस करीत आहेत.

विहिरीतील मोटरपंपचे साहित्य चोरीला

७ हजार २०० रुपयांचे नुकसान : भांडोली शेतशिवारातील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – शेतातील विहिरीतून मोटरपंपला जोडलेला पाईप व केबल चोरीला गेल्याची घटना भांडोली शेतशिवारात उघडकीस आली आहे.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञाताविरुध्द चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी शेख अकबर शेख रजाक हे त्यांच्या शेतात झाडांना पाणी देण्यासाठी गेले असता त्यांनी पाण्याची मोटार सुरु केली. मात्र, पाईपमधून पाणी येत नसल्याने त्यांनी विहिरीत डोकावुन पाहिले. यावेळी विहिरीतील मोटरपंपला जोडलेला पाईप व केबलचा दोर असा एकूण ७ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल तुटलेल्या अवस्थेत आढळून आला.

अज्ञात चोरट्याने विहिरीतील सदर साहित्य चोरुन नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी फिर्यादी यांच्या जबानी रिपोर्टवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.

अल्पवयीन मुलीचे लग्न लावुन शारीरिक संबंध

बाळाला जन्म, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – अल्पवयीन असतांना मुलीचे लग्न लावुन दिल्यानंतर तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवून ती गर्भवती झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना तालुक्यातील भवानी डोह येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २५ मे २०२५ रोजी आरोपी ओमकार मरसकोल्हे याचे अल्पवयीन असतानाच संबंधित मुलीसोबत लग्न लावुन देण्यात आले होते. लग्नानंतर आरोपी ओमकार मरसकोल्हे याने तिच्यासोबत शारीरिक

संबंध प्रस्थापित केल्यामुळे ती गर्भवती झाली.

२१ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधित मुलीला प्रसुतीसाठी सिव्हिल रुग्णालय, पांढुर्णा येथे दाखल करण्यात आले. तेथे तिने एका बाळाला जन्म दिला. याबाबत रुग्णालयाकडून मेमो प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी प्रकरणाची दखल घेतली.

या प्रकरणी शेंदूरजनाघाट पोलिसांनी अल्पवयीन युवतीच्या फिर्यादीवरुन ओमकार मरसकोल्हे रा.निलकंठ, पांढुर्णा मध्यप्रदेश, नरेश वटकर, संतोष मरसकोल्हे, मिना वटकर सर्व रा.भवानीडोह, शेंदुरजनाघाट यांचे विरुध्द कलम ६४ (२), (एम), ६५ (१), ८७, १३७ (२), बीएनएस सहकलम ५ (एल), ६, ५ (जे) (पप), पोस्को सहकलम ९, १०, ११ बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.